## - संगीत सेवा -

सुरांची ही कृपा राहू दे,
तालाचा आशीष मिळो ॥
गतजन्मीचे संचित पण
पुढल्या जन्मी भाग्य मिळो ॥०॥

नको वाहवा, नकोत टाळ्या
दाद मिळावी, नाही आशा ॥
स्वानंद असो चिरकाल आणिक
माझे मीपण दूर पळो ॥२॥

सेवा घडावी संगीताची
हेच मागणे प्रभुचरणांशी ॥
मैफील अशी स्मरणात राहावी,
जेष्ठांचे आशीष फळो ॥३॥

सुरसाधना सतत करावी
गुरुजनांची पूजा व्हावी ॥
सरस्वतीची कृपा असावी,
असुरांची मग दृष्ट टळो ॥४॥

मानसी आठवले -

अक्षर लेखन - प्रकाश देशपांडे
२९ एप्रिल २०२४.